**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४.**

---

क्र. कोविमं/१२ वी परीक्षा/ 727
दिनांक- २४/०६/२०१९

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/ कोल्हापूर

विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) जुलै-ऑगस्ट २०१९ विद्यार्थ्यांची अतिविलंब/ विशेष अतिविलंब /अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत ...

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र.९३ अन्वये जुलै/ऑगस्ट २०१९ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ .१२ वी ) परीक्षेस, प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन परीक्षेची आवेदनपत्र स्किारण्याची मुदत संपल्यावरही (१) श्रेणी /तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाच्या कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु.५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क , (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे , त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रति दिन रु .१००/- विशेष अतिविलंब शुल्क व तद्‌नंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत रु .२०० प्रमाणे (शासनाचे क्र.एसएससी-२०११(१८५/११)उमाशि-२ दिनांक ११ फेब्रु २०१३ च्या पत्रानुसार) अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत .

विलंब शुल्कानंतरची अति विलंब शुल्काची आवेदनपत्रे ही कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर भरावयाची आहेत . त्यानंतर विद्यार्थी व प्राचार्य / मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची मूळ प्रत (Print Out) व आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसांपर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क घेण्यात यावे.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.५०/- प्रतिदिनी , प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिममुदत (रु.१००/- प्रतिदिनी , प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अति विशेष अतिविलंब मुदत (रु.२००/- प्रतिदिनी , प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा** | **सोमवार दिनांक ०१/०७/२०१९ ते सोमवार दिनांक ०८/०७/२०१९** | **मंगळवार दिनांक ०९/०७/२०१९ ते शुक्रवार दिनांक १२/०७/२०१९** | **शनिवार दिनांक १३/०७/२०१९ ते मंगळवार दिनांक १६/०७/२०१९** |

१) अतिविलंब /विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब ने Online ने आवेदनपत्र भरले नंतरच्या Print out सोबत ,सोबतच्या नमुन्यातील परिशिष्ट अ जोडणे अत्यावश्यक आहे.
२) विहित मुदतीत आवेदन पत्र का भरु शकले नाहीत याबाबतचा सबळ पुरावा जोडणे आवश्यक आहे.
३) पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे मागील गुणपत्रकाची साक्षांकित केलेली छायांकित प्रत जोडणे अत्यावश्यक आहे.
४) अतिविलंब /विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल . तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही असे विद्यार्थ्याकडून हमीपत्र घेण्यात यावे . ही बाब कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावे व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी.

24.06

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर

सोबत-परिशिष्ट अ .

Rao general